**प्रेसनोट दिनांक १८/०६/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे**

**जनता वसाहत येथे पुर्व वैमन्स्यातुन एकाचा खुन करण्याचा प्रयत्न करणा-या चार सराईत गुन्हेगारांना दत्तवाडी पोलीसांनी १८ तासातच केले जेरबंद**

दि. १७/०६/२०१९ रोजी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो हवा तानाजी निकम, पो ना सुधीर घोटकुले पो ना महेश गाढवे पो ना सोमेश्वर यादव, पो शि अमित सुर्वे, पो शि सागर सुतकर असे दत्तवाडी पोलीस ठाणे येथे हजर असताना पो. ना. सुधीर घोटकुले यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ''जनता वसाहत गल्ली नं. ७७, वरचा टप्पा येथे दादाराव भोसले यांचा खुन करण्याचा प्रयत्न करणारे गणेश जगदाळे, ओंकार खामकर, अरिफ शेख व राम कांबळे हे चारही आरोपी हे तळजाई पठार येथे थांबले आहेत व त्यांची काहीतरी चर्चा चालु आहे.'' त्यावेळी त्यांनी सदरबाबत पोउनि कुलदिप संकपाळ यांना कळविली असता त्यांनी सदरची बातमी ही वपोनि देविदास घेवारे यांना कळविली त्यावेळी त्यांनी कारवाई बाबत मार्गदर्शन करुन नमुद आरोपीतांना तत्काळ ताब्यात घेणेबाबत आदेशीत केल्याने त्याप्रमाणे पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व वरील स्टाफ यांनी तत्काळ साध्या वेशात खाजगी वाहनाने तळजाई पठार, पुणे येथे जावुन दोन टिम करुन सापळा लावुन योजनेप्रमाणे थोडे आडबाजुला थांबुन खात्री केली असता पाहीजे आरोपी गणेश जगदाळे, ओंकार खामकर, अरिफ शेख व राम कांबळे हे तळजाई पठारावरील मोकळया मैदानाशेजारी झाडाजवळ थांबलेले पोलीसांना दिसले त्यावेळी पोलीसांनी त्यांना ओळखले व पोलीसांची खात्री झाल्यानंतर पोलीसांनी त्यांना अत्यंत शिताफीने जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थीतीत ठेवुन त्यांची नावे पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे १) गणेश बबन जगदाळे रा. गल्ली नं. ७८, राममंदीरजवळ, जनता वसाहत पर्वती पुणे २) ओंकार गजानन खामकर, रा. गल्ली नं. ७७, राममंदीरजवळ, जनता वसाहत पर्वती पुणे ३) अरिफ अखिल शेख रा. सदर ४) राम कैलास कांबळे रा. सदर अशी असल्याची सांगीतली त्यावेळी पोलीसांनी त्यांना त्यांचेवर दाखल असलेले गुन्हयात त्यांचे सहभागाबाबत विचारले असता त्यांनी दाखल गुन्हा केल्याचे कबुल केले असुन दादाराव भोसले यांचा खुन करण्याचा त्यांनी सर्वांनी प्रयत्न केला असल्याचे सांगीतले आहे म्हणुन त्यांना दाखल गुन्हयात पोलीसांनी ताब्यात घेवुन अटक केले आहे.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो. हवा. तानाजी निकम, पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो. ना. सोमेश्वर यादव, पो. कॉ. सागर सुतकर, अमित सुर्वे, विकास कदम, अक्षयकुमार वाबळे, शरद राऊत, यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा नंदकुमार केंन्चे सपोनि, दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर हे करीत आहेत.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे